# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः15.05.2024** **वारःबुधवार**

---

१. राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी सामाजिक-भान जपत प्रचारातील भाषणांचा दर्जा चांगला ठेवावा- निवडणूक आयोगाची अपेक्षा

२. भारत कौशल्य स्पर्धा आजपासून नवी दिल्लीत सुरू होणार

३. चीनमधून येणारी विजेवर चालणारी वाहनं, सौर सेल्स आणि ॲल्युमिनियम यावर सीमाशुल्क आकारण्याचा अमेरिकेचा निर्णय

४. राजस्थानमधील नीम का थाना जिल्ह्यामध्ये कोलीहान खाणीत अडकलेल्या १४ पैकी तिघांना बाहेर काढण्यात यश आणि

५. एफआयएच हॉकी युरोपीय स्पर्धांसाठी भारतीय संघ बेल्जियमला रवाना

**<u>निवडणूक</u>**

सध्या सुरू असलेल्या निवडणुकांच्या काळात राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी सामाजिक भान जपत प्रचारातील भाषणांचा दर्जा चांगला राखून आदर्श उदाहरण घालून द्यावं, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. देशाच्या सामाजिक सलोख्याला खोलवर तडा जाऊ नये म्हणून निवडणूक प्रचार सभांची भाषा संयत ठेवणं ही प्रथमतः नेत्यांची जबाबदारी आहे, असंही आयोगानं म्हटलं आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकांसाठी १६ मार्चला आदर्श आचार संहिता लागू झाल्यापासून विविध राजकीय पक्षांनी दाखल केलेल्या आचार संहिता भंगाच्या तक्रारींपैकी ९० टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्याचंही आयोगानं सांगितलं. विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून दाखल झालेल्या आचार संहिता भंगाच्या ४२५ ठळक तक्रारींपैकी ४०० तक्रारींवर आवश्यक कारवाई किंवा त्यांचं निराकरण करण्यात आलं आहे. काँग्रेस आणि भाजप वगळता अन्य कुठल्याही राजकीय पक्षानं दाखल केलेली एकही तक्रार प्रलंबित नसल्याचं देखील आयोगानं नमूद केलं. आयोगानं दिलेल्या माहितीनुसार काँग्रेसनं १७० भाजपनं ९५ तर इतर पक्षांनी १६० तक्रारी दाखल केल्या आहेत. यापैकी काँग्रेस आणि भाजपनं परस्परांच्या विरोधात दाखल केलेल्या काही तक्रारी प्रलंबित आहेत.

**<u>पाचवा-टप्पा</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात राज्यातल्या 11 जागांसाठी 20 मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यासाठीच्या प्रचारानं आता वेग घेतला आहे. पंतप्रधान आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी आज नाशिकमध्ये जाहीर सभा घेणार आहेत. दुपारी एक वाजता निफाड तालुक्यातल्या पिंपळगाव बसवंत इथं

त्यांची सभा होईल. त्यानंतर ते कल्याणमध्ये सभेला संबोधित करतील आणि संध्याकाळी मोदी मुंबईत घाटकोपर इथं पथ फेरी काढणार आहेत.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याही आज नाशिकमध्ये सभा होणार आहेत.

दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वाराणसी लोकसभा मतदारसंघातून भाजपा उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<u>कौशल्य स्पर्धा</u>**

भारतीयांना त्यांचं सर्वोत्तम कौशल्य दर्शवता यावं या अनुषंगानं घेण्यात येणारी देशातील सर्वात मोठी कौशल्य स्पर्धा आजपासून नवी दिल्लीत सुरू होत आहे. यंदाच्या भारत कौशल्य विकास स्पर्धेत 30 हून अधिक राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील नऊशेहून अधिक विद्यार्थी सहभागी होत असल्याची माहिती कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाकडून देण्यात आली. या कार्यक्रमात चारशेहून अधिक उद्योग तज्ञही सहभागी होणार आहेत. चार दिवस चालणाऱ्या या कौशल्य स्पर्धेतील सहभागींना पारंपरिक कला तसंच अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित ६१ विविध प्रकारच्या कौशल्यांचं या राष्ट्रीय पातळीवरच्या व्यासपीठावर दर्शन घडवण्याची संधी मिळणार  आहे. यामध्ये ड्रोनद्वारे चित्रीकरण,वस्त्र विणकाम, चामड्याची पादत्राणं, प्रोस्थेटिक-मेकअप अशा विविध विभागात विद्यार्थ्यांना आपलं कौशल्य दाखवता येईल.

**<u>सीमाशुल्क</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या सरकारनं चीनमधून येणारी विजेवर चालणारी वाहनं, बॅटरी, स्टील, सौर सेल्स आणि ॲल्युमिनियम यावर मोठे सीमाशुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. अशा निर्णयामुळे प्रचलित होऊ पाहणाऱ्या अनुचित व्यापारी पद्धतींमुळे अमेरिकेतील कामगारांचे नुकसान होणार नाही, असं प्रशासनानं म्हटलं आहे. यामध्ये विजेवर चालणाऱ्या वाहनांवर शंभर टक्के सीमाशुल्क आकारण्यात येणार असून सेमीकंडक्टर्सवर ५० टक्के आणि विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या बॅटरीवर २५ टक्के शुल्क आकारण्यात येणार आहे. व्हाईट हाऊसच्या रोझ गार्डनमधून दिलेल्या संदेशात बायडेन यांनी म्हटलं आहे की अमेरिकन नागरिक पूर्वीप्रमाणेच आताही त्यांना हवी ती कार बाजारातून विकत घेऊ शकतात, पण या गाड्यांच्या बाजारपेठेवर अनुचित मार्गाने कब्जा मिळविण्याचे चीनचे प्रयत्न अमेरिका कधीही यशस्वी होऊ देणार नाही. आपल्या सरकारला चीनबरोबर निखळ स्पर्धा हवी असून आम्ही संघर्षाच्या विरोधात आहोत. एकविसाव्या शतकात वॉशिंग्टन आणि चीन दरम्यान सुरु असलेली आर्थिक वर्चस्वाची स्पर्धा  जिंकण्यास अमेरिका इतर कुठल्याही देशापेक्षा कधीही सक्षम आहे, असंही बायडेन यांनी म्हटलं आहे.

**<u>नॉर्वे चर्चा</u>**

भारत आणि नॉर्वे दरम्यानच्या अकराव्या विदेश कार्यालय सल्लामसलत बैठकीचं काल नवी दिल्ली इथं आयोजन करण्यात आलं होतं. दोन्ही देशांनी विविध क्षेत्रात मजबूत सहकार्य आणि भागीदारीला चालना देण्याचं यावेळी सुनिश्चित केलं. नील अर्थव्यवस्था, नवीकरणीय ऊर्जा, जलवायू आणि पर्यावरण, सौर आणि पावन ऊर्जा, अंतराळ क्षेत्रातील सहकार्य, आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये द्विपक्षीय सहकार्य आणि विस्तारासह वैविध्य आणण्याच्या दृष्टीनंया बैठकीत चर्चा करण्यात आली. या उभय देशांमध्ये राजनैतिक आदानप्रदान आणि बळकट  द्विपक्षीय संबंध असून सागरी क्षेत्रासह इतर विविध क्षेत्रात सातत्यानं शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी नील अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा विचार उभय देशांच्या परस्पर संबंधांचा मुख्य आधार आहे, असं भारतीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>हरित-हायड्रोजन</u>**

नेदरलँड्समधील रॉटरडॅम इथं सध्या सुरू असलेल्या यावर्षीच्या जागतिक हायड्रोजन शिखर परिषदेत भारतानं प्रथमच आपलं दालन मांडलं आहे. नवीकरणीय ऊर्जा विभागाचे सचिव भूपिंदर भल्ला यांनी या दालनाचं उद्घाटन केलं. देशानं हरित हायड्रोजन क्षेत्रात केलेली प्रगती या दालनात दर्शवण्यात आली आहे. या शिखर परिषदेला जगभरातून सुमारे पंधरा हजार प्रतिनिधी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. भारतानं 2030 च्या अखेरपर्यंत 5 दशलक्ष मेट्रिक टन हरित हायड्रोजनची निर्मिती क्षमता साध्य करण्याचं आपलं उद्दीष्ट साध्य करण्यासाठी गेल्या वर्षी जानेवारीपासून राष्ट्रीय हरित हायड्रोजन मोहीम सुरू केली आहे.

**<u>बायोमास</u>**

हरित जैविकहायड्रोजन उत्पादनासाठी नापीक झालेल्या जमिनीचा वापर करून अशा जमिनीत बायोमासची निर्मिती करण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी आज पहिली बैठक आयोजित करण्यात आली आहे. भारत सरकाचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार अजय कुमार सूद यांनी ही बैठक बोलावली आहे. यामध्ये संबंधित मंत्रालयं, या क्षेत्रातील जाणकार आणि संशोधन संस्थांना एकत्र आणलं जाणार असून पडीक, नापीक झालेल्या जमिनींवर कोणत्या प्रकारे बायोमास निर्मिती करता येऊ शकेल यावर विचारमंथन केलं जाईल.

**<u>एलटीटीई</u>**

केंद्र सरकारनं लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलम अर्थात LTTE वर घातलेली बंदी आणखी पाच वर्षांसाठी वाढवली आहे. भारताच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेला सतत धोका निर्माण करणाऱ्या एलटीटीईच्या कारवाया लक्षात घेऊन केंद्र सरकारनं हा निर्णय घेतला आहे, असं गृह मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. भारतीय नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करणाऱ्या LTTE नं केलेल्या विघटनकारी, फुटीरतावादी कारवायांचा उल्लेख करत हेच या संघटनेवर बंदी घालण्याचं कारण असल्याचं मंत्रालयानं  म्हटलं आहे. सरकारनं मे 2019 मध्ये LTTE ला बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित केलं होतं.

**<u>अधिकारी</u>**

राजस्थानच्या नीम का थाना जिल्हयामध्ये कोलीहान खाणीत उद्वाहक कोसळल्यामुळे हिंदुस्तान कॉपर लिमिटेड या कंपनीचे १४ कर्मचारी काल रात्रीपासून अडकून पडले आहेत. खाणीसाठी असलेल्या

उद्‌वाहकाची दोरी तुटल्यामुळे झालेल्या या दुर्घटनेत अनेक लोक जखमी झाले असल्याची शक्यता आहे. हे ठिकाण शेकडो मीटर खोल असून या ठिकाणी बचाव पथक पोहोचलं आहे. आत्तापर्यंत तीन जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आलं आहे.

**<u>हॉकी</u>**

एफआयएच हॉकी युरोपीय स्पर्धांसाठी भारतीय संघ काल बेल्जियम इथल्या अंटवर्प इथं रवाना झाला. येत्या जुलैमध्ये होणाऱ्या पॅरिस ऑलिंपिक स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर या स्पर्धना विशेष महत्त्व आहे. भारताचा पहिला सामना येत्या 22 तारखेला अर्जेंटीनाबरोबर होणार आहे. त्यानंतर 23आणि 25 तारखेला भारतीय संघाची लढत बेल्जियम बरोबर होणार आहे. या हॉकी स्पर्धचा दुसरा  हंगाम लंडनमध्ये सुरू होणार असून त्यापूर्वी 26 तारखेला भारताचा सामना दुसऱ्यांदा अर्जेंटीनाबरोबर होणार आहे. लंडनमध्ये एक आणि आठजूनला भारताचा सामना  जर्मनीबरोबर होणार असून दोन आणि नऊ  जूनला भारत ब्रिटनच्या संघाबरोबर खेळणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.